# बृहन्मुंबई महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन खाते 'ई' विभाग**

**सहा. अभि./ई/२०३४/घकव्य. दि. २५.०४.२०२५**

विषय:- 'ई' विभागातील सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता व निर्जतुकीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता अशासकीय संस्थांची नेमणूक करण्याबाबत.

**"स्वारस्य अभिव्यक्ती"**

'ई' विभागातील सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता व निर्जतुकीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता अशासकीय संस्थांची नेमणूक करण्याबाबत. ई विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा, सहकारी संस्था, अशासकीय संस्था इ. संस्थेमार्फत कामगारांचा पुरवठा करण्याकरिता संस्थेची निवड, पात्रता यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामासाठी निवड करावयाच्या संस्था | निविदा फॉर्म रक्कम |
|---|---|---|---|
| १. | 'ई' विभागातील सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता व निर्जतुकीकरण करण्याबाबतच्या कामा अंतर्गत अशासकीय संस्थांची | ०४ | रु. ३,६३०/- + (१८% जी.एस. टी) |

अर्जाचा नमुना **ई** विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे वरील तक्त्यामध्ये दिलेल्या निविदा फॉर्म रक्कम रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. **बृहन्मुंबई महानगरपालिका (Municipal Corporation of Greater Mumbai)** या नावाने (ना-परतावा) नागरिक सुविधा केंद्र **(C.F.C.)** येथे जमा केल्यानंतर अर्ज दि. २५.०४.२०२५ ते दि. २९.०४.२०२५ सकाळी १०.३० ते संध्यासाळी ०४.०० (दुसरा व चौथा शनिवार वगळून) या वेळेत मिळु शकेल. पात्र संस्थांची यादी व सोडतीचा दिनांक 'ई' विभाग कार्यालय येथे सूचना फलकावर लावण्यात येईल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थाना कामाचे वाटप संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील, प्रत्येक कामासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र रक्कम भरणे आवश्यक आहे.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी **'ई'** घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क साधावा. संस्थंने **ई** विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारिख दि.२९.०४.२०२५ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत आहे.

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणा०र नाहीत.

सही/-
सहा.अभि.(घकव्य) 'ई' विभाग